आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

९ मार्च २०२४ -शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- कोणत्याही क्षेत्राचा विकास करताना तो पर्यावरण पूरकच असायला हवा असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं प्रतिपादन
- लोकसभेसाठी भाजपाच्या जागावाटपाचं ८० टक्के काम पूर्ण / चर्चा करून लवकरच जागावाटप जाहीर करणार - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती
- आजपासून देशभरात पोषण पंधरवडा २०२४ चं आयोजन
- धरमशाला इथं झालेल्या पाचव्या कसोटीसह इंग्लंडविरोधातली मालिका भारतानं ४-१ अशी जिंकली / कसोटी क्रिकेटमध्ये ७०० बळी घेणारा जेम्स अँडरसन्स जगातला पहिला वेगवान गोलंदाज

  **आणि**
- मुंबई आणि विदर्भाच्या क्रिकेट संघात रणजी करंडकाची अंतिम लढत उद्यापासून मुंबईत

**<><><><><>**

राज्यातल्या कोणत्याही परिसराचा विकास करताना तो पर्यावरण पूरकच असला पाहिजे, असं आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. सातारा जिल्ह्यात जावळी तालुक्यात मुनावळे इथं कोयना धरणाच्या शिव सागर जलाशयात पर्यटन विकास महामंडळाच्या कोयना जल पर्यटन केंद्राचं उद्घाटन त्यांच्या हस्ते झालं. त्यावेळी ते बोलत होते. हे केंद्र हे देशातल्या गोड्या पाण्यातलं सर्वात मोठं जल पर्यटन केंद्र असून या माध्यमातून पर्यावरण पूरक विकास आणि स्थानिकांना रोजगार या बाबींना प्राधान्य देण्यात येणार आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्र्यांनी केलं.

महाबळेश्वर तालुक्यातल्या मौजे दरे इथं बांबू मूल्यवर्धन केंद्र आणि टसर रेशीम शाश्वत रोजगार  आणि वनसंवर्धन प्रकल्पाचं  लोकार्पण तसंच गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार योजनेचं उद्घाटन आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं. या कार्यक्रमाला राज्य उत्पादन शुल्क मंत्री तथा सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई, उद्योग मंत्री उदय सामंत, आमदार श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर आदी उपस्थित होते. वन्य रेशीम शाश्वत रोजगार आणि संवर्धन प्रकल्पाचं लोकार्पण मुख्यमंत्र्यांचे  वडील संभाजी शिंदे यांच्या हस्ते  मौजे दरे इथं झालं.  सह्याद्री पर्वतरांगातील शेतकऱ्यांसाठी ही शेती वरदान ठरेल  असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आपल्या इशान्य भारताच्या भेटीत मणिपूर, मेघालय, नागालँड, सिक्कीम, त्रिपुरा आणि अरुणाचल प्रदेशात सुमारे ५५ हजार ६००  कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन केलं. हा कार्यक्रम  अरुणाचल प्रदेशातल्या इटानगर इथं आयोजित करण्यात आला होता. यावेळी त्यांनी सेला बोगदा राष्ट्राला समर्पित केला. उन्नती योजनेमुळे ईशान्येकडील राज्यांच्या औद्योगिक विकासाला चालना मिळेल आणि या राज्यांचा आर्थिक विकास होण्यास मदत होईल असं प्रधानमंत्री मोदी यांनी यावेळी सांगितलं.

त्यांनी आज आसामलाही भेट दिली. यावेळी त्यांनी १७ हजार ५००  कोटी रुपयांच्या प्रकल्पांचं उद्घाटन केलं. ईशान्य भारताचा विकास संपूर्ण  भारताच्या विकासासाठी महत्त्वाचा असल्याचं ते जोरहाट इथल्या सभेला संबोधीत करताना म्हणाले. आज सकाळी त्यांनी आसाममधल्या काझीरंगा राष्ट्रीय उद्यान आणि व्याघ्र प्रकल्पात सफारी केली.

यानंतर आज संध्याकाळी त्यांनी पश्चिम बंगालमध्ये सिलिगुडीला भेट दिली. तिथं झालेल्या कार्याक्रमात त्यांनी ‘विकसित भारत विकसित पश्चिम बंगाल’ कार्यक्रमात चार हजार पाचशे कोटी रुपयांच्या रेल्वे आणि रस्ते प्रकल्पांचं उद्घाटन, पायाभरणी आणि राष्ट्रार्पण केलं. यावेळी त्यांनी जनसभेलाही संबोधीत केलं. देशातल्या गरिबांच्या सर्वांगीण विकासाकरता आपलं सरकार वचनबद्ध असल्याचं ते म्हणाले.

**<><><><>**

देशातलं सर्वात सुंदर आणि उच्च दर्जाच्या सुविधांनी युक्त असं दिव्यांग पार्क नागपूर शहरात होत असून याचा फायदा दिव्यांगाना होईल असं आज केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री  नितीन गडकरी यांनी नागपुरात सांगितलं. पूर्व नागपुरातील सूर्य नगर इथं दिव्यांगांसाठी अनुभुती इन्क्लुझिव्ह पार्कचा लोकार्पण समारंभ त्यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते.

या पार्कमध्ये फिजिओथेरपी इमारत, हायड्रोथेरपी रूम, क्लासरूम, वॉटर इक्विटी झोन, किचन कॅन्टीन, दृष्टीहीन लोकांसाठी स्पर्शिकामार्ग, श्रवणदोष असलेल्यांसाठी सांकेतिक भाषा निर्देशक आणि ब्रेल लिपी मधील नामांकन आणि चिन्हांचा समावेश आहे.

**<><><><>**

मुंबईतल्या साकी नाका इथल्या बहुउद्देशीय प्रदर्शन-कम-कन्व्हेन्शन सेंटरची पायाभरणी केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे यांच्या हस्ते झाली.  मुंबई जागतिक दर्जाचे शहर आहे, देशातल्या  उद्योगधंद्यांची प्रगतीही मुंबईमुळेच झाली असं ते म्हणाले. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत हे केंद्र उभारले जात असल्यानं या वास्तुचा दर्जाही उत्तम असायला हवा असं ते

म्हणाले. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या माध्यमातून मुंबईची उलाढाल हजारो कोटींपर्यंत पोहोचली पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

यावेळी राणे यांनी बहुउद्देशीय प्रदर्शनालाही भेट दिली, तसंच पुणे एमएसएमई विकास आणि सुविधा कार्यालयाचंही उद्घाटनही त्यांनी केलं.

**<><><><><>**

मुंबई  किनारी रस्ता प्रकल्पाची वरळी ते मरीन ड्राईव्ह दक्षिणवाहिनी मार्गिका येत्या सोमवारपासून वाहतुकीसाठी अंशतः खुली होणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि  अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे. किनारी रस्त्याची वरळी ते मरीन ड्राइव्ह ही मार्गिका आठवड्यातले  सोमवार ते शुक्रवार असे पाच दिवस दररोज सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत वाहतुकीसाठी सुरु असेल. तर शनिवार आणि रविवारी वाहतूक पूर्णपणे बंद असेल.

**<><><><><>**

लोकसभेसाठी भाजपानं जागावाटपाचं ८० टक्के काम पूर्ण केलं असून चर्चा करून लवकरच सर्व जागावाटप जाहीर करणार असल्याचं आज  उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर इथं प्रसारमाध्यमांना सांगितलं. सध्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची हिंदुत्वाविषयीची व्यापक भूमिका ही भाजपच्या विचारांशी विसंगत नसून एक सारखीच आहे, असंही ते म्हणाले.

महावितरणच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे काही मूलभूत प्रश्न असून त्यांच्याशी चर्चा झाल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबई भाजपाने सहा डिजिटल प्रचार रथ यात्रा आजपासून रवाना केल्या. मुंबई भाजपचे अध्यक्ष आमदार आशिष शेलार यांनी या यात्रेचं दादरच्या भाजप कार्यालयात उद्घाटन केलं. यावेळी आमदार प्रसाद लाड, महामंत्री संजय उपाध्याय यांसह माजी नगरसेवक, पदाधिकारी उपस्थित होते.

**<><><><><>**

महिला आणि बाल विकास मंत्रालयानं आजपासून  पोषण पंधरवडा २०२४ चं आयोजन केलं आहे. यात २३ तारखे पर्यन्त चालणाऱ्या  या  पोषण पंधरवड्यामध्ये बालकांची  काळजी आणि शिक्षण, पारंपरिक आहार पद्धती, माता आणि बाल आरोग्यासाठी ‘पोषण भी पढाई भी’ ही संकल्पना असल्याचं केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्री स्मृती इराणी यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात सांगितलं. या अंतर्गत शाश्वत अन्न प्रणाली, स्वच्छता, अशक्तपणा व्यवस्थापन असे उपक्रम घेणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मुंबईतल्या धारावीत खडतर परिस्थितीत राहणाऱ्या उमेश किलूनं आज चेन्नईतल्या अधिकारी प्रशिक्षण अकादमीतून प्रशिक्षण पूर्ण केलं आणि भारतीय लष्करात अधिकारी म्हणून रुजू झाला. त्यांच्या संघर्षाविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड - व्हाइस कास्ट**

**<><><><><>**

भारत आणि इंग्लंड यांच्यात धरमशाला इथं झालेला पाचव्या आणि अखेरच्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारतानं इंग्लंडवर एक डाव आणि ६४ धावांनी विजय मिळवला. याबरोबरच भारतानं ही मालिकाही ४-१ अशी जिंकली. पहिल्या डावात ५ गडी बाद करणाऱ्या कुलदीप यादव हा सामनावीर तर मालिकेत सर्वाधिक धावा करणारा यशस्वी जयस्वाल मालिकावीर ठरला.  सामन्याच्या आज तिसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात भारताचा पहिला डाव केवळ ४ धावांची भर घालून ४७७ धावांत आटोपला, आणि भारतानं इंग्लंडवर पहिल्या डावात २५९ धावांची भक्कम आघाडी घेतली. त्यानंतर दुसऱ्या डावातही भारताच्या गोलंदाजांनी भेदक गोलंदाजी करत चहापानाआधीच इंग्लंडच्या संपूर्ण संघाला केवळ १९५ धावांतच तंबूत धाडलं. वैयक्तिक शंभरावी कसोटी खेळत असलेल्या भारताच्या आर.अश्विन यानं दुसऱ्या डावात इंग्लंडचे ५ फलंदाज बाद करत, सामन्यात एकूण ९ बळी घेतले. इंग्लंडच्या वतीनं जो रुट यानं सर्वाधिक ८४ धावा केल्या.

याच कसोटी सामन्यात सकाळच्या सत्रात इंग्लंडचा जेम्स अँडरसन यानं भारताच्या कुलदीप यादवला बाद करत कसोटी कारकिर्दीतील ७०० बळींचा टप्पा गाठला. कसोटी क्रिकेटमध्ये ७०० बळी घेणारा तो जगातला पहिला वेगवान गोलंदाज ठरला आहे. तर श्रीलंकेचा मुथैय्या मुरलीधरन आणि ऑस्ट्रेलियाच्या शेन वॉर्ननंतर कसोटी क्रिकेटमध्ये ७०० बळींचा टप्पा गाठणारा तो तिसरा गोलंदाज ठरला आहे.

या विजयानंतर भारतीय क्रिकेट नियामक मंडळ अर्थात बीसीसीआयनं एका विशेष कसोटी क्रिकेट प्रोत्साहन योजनेची घोषणा केली. या योजनेअंतर्गत खेळाडूंना कसोटी सामन्यासाठी मिळणाऱ्या मानधनाव्यतरिक्त अधिकची रक्कम प्रोत्साहन म्हणून दिली जाणार आहे असं बीसीसीआयचे सचिव जय शहा यांनी सांगितलं.

**<><><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी उद्या मुंबईत वानखेडे स्टेडिअमवर मुंबई आणि विदर्भ यांच्यात अंतिम सामन्याला सुरुवात होईल. सकाळी साडेनऊ वाजता हा सामना सुरु होईल. या स्पर्धेत तब्बल ५३ वर्षांनंतर पहिल्यांदाच एकाच राज्यातले दोन संघ अंतिम फेरीत पोहोचले आहेत. उपांत्य फेरीतल्या सामन्यात मुंबईनं तामीळनाडूचा पराभव करुन ४८व्यांदा अंतिम फेरी गाठली. तर विदर्भानं मध्यप्रदेशाचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला.  मुंबईनं आत्तापर्यंत एकूण ४१ वेळा विजेतेपद पटकावलं आहे, मात्र गेल्या आठ वर्षांपासून ते ४२व्या विजेतेपदाच्या प्रतिक्षेत आहेत. विदर्भानं आत्तापर्यंत दोन वेळा रणजीचं विजेतेपद पटकावलं आहे.

<><><><><>

कोकणातल्या कमाल तापमानात काल सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली. राज्यातलं रात्रीचं तापमान मात्र सरासरीच्या जवळपास होतं. येत्या दोन दिवसात राज्यातलं हवामान कोरडं राहण्याची शक्यता असल्याचं हवामान विभागानं सांगितलं.

//<><><><><>//